# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७ (भारत)
Board of Sports & Physical Education, Near. IUCAA, Ganeshkhind, Pune – 411007 (INDIA)
Telephone No. 02025622664, 66 e-mail: directorsports@unipune.ac.in

FIT INDIA

**Ref. No.** विक्रीमं/२२८ दिनांक:०७/११/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणा—या विविध संघातील खेळाडूंना महाविद्यालयीन स्तरावर प्रोत्साहन/ आहार भत्ता देण्याबाबत...

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/मान्यतप्राप्त परिसंस्थेतील खेळाडू हे प्रतिवर्षी पश्चिम तसेच दक्षिण— पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ, अखिल भारतीय अंतर विद्यापीठ व खेलो इंडिया त्याचप्रमाणे मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रेरणेने आयोजित क्रीडामहोत्सव स्पर्धेत विद्यापीठाचे एकूण ५२ क्रीडा प्रकारातील खेळाडू (मुले व मुली) भारतातील विविध राज्यातील विद्यापीठात आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करीत असतात.

उपरोक्त खेळाडूंना दि. २६ ऑगस्ट, २०२३ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन परिषदच्या ठराव क्र. ७८ प्रव अ—३२१/२६०८२३ अन्वये प्रत्यक्ष स्पर्धेदरम्यान प्रतिदिनी रू.६००/— व सराव शिबीरादरम्यान प्रतिदिनी रू.३००/— देण्याचे मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावान्वये नमूद करण्यात आल्यानुसार अदा करण्यात येत आहेत.

दिनांक २६ ऑक्टोबर, २०२४ रोजी संमत झालेल्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्रं. म:२८९/२६१०२४ नुसार **अधिकचा रू.३००/— प्रोत्साहन/आहार भत्ता** हा संबंधित खेळाडू ज्या महाविद्यालय/परिसंस्थेचा असेल त्या महाविद्यालय/परिसंस्थेने संबंधित खेळाडूस प्रत्यक्ष स्पर्धेदरम्यान (संघ पुण्याहून स्पर्धेकरिता ज्या दिवशी रवाना होईल त्या दिवसापासून पुण्यास परत येईपर्यंत) अदा करावा असे ठरले आहे.

आपणास विनंती उपरोक्त ठरावान्वये शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून प्रतिवर्षी आपल्या महाविद्यायल/परिसंस्थेतील जे खेळाडू विद्यापीठाचे पश्चिम तसेच दक्षिण— पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ, अखिल भारतीय अंतर विद्यापीठ व खेलो इंडिया त्याचप्रमाणे मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रेरणेने आयोजित क्रीडामहोत्सव स्पर्धेत प्रतिनिधीत्व करतील, अश्या खेळाडूंना संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने **अधिकचा रू.३००/— प्रोत्साहन/आहार भत्ता** प्रत्यक्ष स्पर्धेदरम्यान (संघ पुण्याहून स्पर्धेकरिता ज्या दिवशी रवाना होईल त्या दिवसापासून पुण्यास परत येईपर्यंत) आपल्या स्तरावर अदा करावा.

धन्यवाद !
कळावे,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा पुणे-४११००७

आपला,

(डॉ.विष्णू पेठकर)
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
विद्यापीठ क्रीडा व शा. शि. मंडळ